# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/11/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

### दानपेटी चोरी

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत हाजी सय्यद पिर जिनवाले बाबांची काटोल येथे दिनांक १४/११/२०२३ ते दि. १५/११/२०२३ चे वेळ २१.१० वा. ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे—शहजाद मस्जिदभाई पटेल, वय ३८ वर्ष रा. संचेती ले आउट काटोल हा दिनांक १५/११/२०२३ रोजी सकाळी ९/०० वा. दरम्यान दर्गाची साफ सफाई करीत असताना बाहेरील बाजुला भिंतीला लावुन असलेली दानपेटी दिसली नाही त्यामुळे दर्गाच्या आजुबाजुला पडली आहे का शोध घेतला असता मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने दर्गाचे भिंतीला लावलेली दानपेटी चोरून त्यामध्ये असलेले अंदाजे २०,०००/— रू. चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक उईके मो. नं. ९०७५१६२८९६ हे करीत आहे.

### मोटारपंप चोरी

पो.स्टे. केळवद :— अंतर्गत २५ किमी अंतरावर मौजा उमरी शिवार येथे फिर्यादी नामे— मोहीत श्रावण खंगार, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र. २ उमरी ता. सावनेर जि. नागपुर यांनी पिकाला पाणी ओलण्याकरिता शेताजवळील नहरवर गंगोत्री कंपनिची पानबुडी मोटरपंप ३ एचपीची लावलेली होती. दि. १४/११/२०२३ चे २२/३० वा. ते दिनांक १५/११/२०२३ चे सकाळी ०८/०० वा. दरम्यान त्यांचे मौजा उमरी शिवारातील पाणी पाहण्याकरिता व मोटरपंप बंद करण्याकरिता शेतात आले असता शेतात पाणी ओलीत झालेले दिसले नाही मोटरपंप खराब झाले का म्हणुन नहरवर पाहण्याकरिता गेले असता मोटरपंपचा पाईप पाण्यावर तरंगतांना दिसला तसेच पाण्यात जावून मोटरपंप शोधली असता मोटरपंप दिसुन आली नाही नहरवरील गंगोत्री कंपनिची पानबुडी मोटरपंप ३ एचपीची किंमती अंदाजे ८,०००/—रु ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सुधिर यादगिरे मो. नं. ८८८८६५८७१३ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत संतोष भारत गॅस गोडावून नरखेड येथे दिनांक १४/११/२०२२३ चे १६.०० वा. दिनांक १५/११/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे – रविंद्र संतोषराव बागडे, वय ५१ वर्ष रा. नरखेड यांच्याकडे संतोष भारत गॅस ग्रामिण वितरक नरखेड नावाने गॅस एजंसी असुन गॅस गोडाउन पुराना पिंपळगाव वखाजी रोडवर गोडावून आहे. ते दिनांक १४/११/२०२३ रोजी दुपारी ०४:०० वा सुमारास गोडाउन बंद करून लॉक लावून नरखेडला आले परत दिनांक १५/११/२०२३ रोजी सकाळी ०९:०० वा. दरम्यान नेहमी प्रमाणे गोडावूनवर सिलेंडर आणणे करीता गेले असता गोडावूनचे मुख्य लोखंडी दरवाजाचे लॉक तुटलेले दिसले तेव्हा आत जावून पाहिले असता १२ सिलेंडर १४.२ किग्रॅमचे घरगुती वापराचे प्रत्येकी ९६३/– रू प्रमाणे एकुण ११५५६/– रूपयाचे सिलेंडर कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ शैलेश डोंगरदिवे पोस्टे नरखेड मो. क्र. ७०५७४०१५९८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**